राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या केंद्र पुरस्कृत योजना सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत् (TSP) प्राप्त झालेला केंद्र हिस्सा वितरीत करणेबाबत. **(२२१० F७५६)**

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ /प्र.क्र.०५ /कार्यासन.६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख:- १० ऑक्टोबर, २०१७.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७..
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारचे पत्र क्र.एल-१९०१५/९/२०१६-TB(Pt), दि.२७.०३.२०१७
५) सार्वजनिक आरोग्य विभागाची नस्ती क्र.साआवि - ३००११ /प्र. क्र. ९९४/२०१६/आ-०७.

शासन निर्णय-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र.टी-५ मधील २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०६- सार्वजनिक आरोग्य, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, ०१-जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (१९) सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (केंद्र हिस्सा), (२२१० F७५६), ३१ -सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षात रु.५८९.४९ लाख इतका निधी अर्थसंकल्पित आहे.

केंद्र शासनाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता या योजनेखाली त्यांच्या वरील संदर्भ क्र. (४) मधील पत्रान्वये रु. ६६२.०२ लाख इतका निधी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत राज्य शासनास वितरीत केलेला आहे. संदर्भ क्र. ५ येथील नस्तीवर सदरचा निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीतून वितरीत करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने (०१) (१९) सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (केंद्र हिस्सा), (२२१० F७५६), ३१ -सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली रु. ५८९.४९ लाख (अक्षरी रुपये पाच कोटी एकोणनव्वद लाख एकोणपन्नास हजार फक्त) इतका निधी या योजनेचे नियंत्रक अधिकारी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना खर्चासाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास,

नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्राकरिता (TSP) उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर (OTSP) केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. ३६४/अर्थोपाय, दि. ०५-०८-२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००९१८३११६०९२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2017.10.10 14:59:46 +05'30'

(रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
२) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३) सर्व जिल्हाधिकारी,महाराष्ट्र राज्य
४) महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई

५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.

६) महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

७) विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ पुणे.

८) अधिदान व लेखधिकारी,मुंबई.

९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१०) वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

११) सार्वजनिक आरोग्य विभाग (आरोग्य-६), मंत्रालय, मुंबई

१२) कार्यासन अधिकारी (का.क्र. ८), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.